# दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (शेडयुल्ड बँक)

## ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

रविवार दि. १३.०९.२०१५ रोजी बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा महावीर हॉल, आग्रा रोड, कल्याण(प.) येथे दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सभेच्या ठिकाणी ठिक दु. ३.०० वाजता गणसंख्या १२१ इतकी होती. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी जाहीर केले की, सभेस आवश्यक ती गणसंख्या नाही, सबब सभा अर्धा तास तहकुब केली जात आहे. सदर सभा अर्ध्या तासानंतर ठिक ३.३० वाजता भरेल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. त्यानंतर ठिक दु. ३.३० वाजता सभा भरली. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली. तसेच अहवालातील मुद्रणदोष सांगितले.

मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले व ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा. संचालक श्री. हेमल रवाणी यांना सभेपुढे कायम करण्यासाठी ठेवावे असे सुचविले.

**विषय : रविवार दि. ०३.०८.२०१४ रोजी झालेल्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

रविवार दि. ०३.०८.२०१४ रोजी झालेल्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा. संचालक श्री. हेमल रवाणी यांनी सभेसमोर सादर केले. सदर इतिवृत्ताच्या छापील प्रती सभासदांना आधीच उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होत्या. यानंतर मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन यांनी सभेपुढे ठराव मंजूरीकरिता मांडला.

सदर ठराव कायम करणेपूर्वी काही सभासदांनी प्रश्न उपस्थित केले.

सभासद श्री. अक्षय पटवर्धन यांनी सूचना स्वरुपात सांगितले की गेल्या वर्षी ज्या सभासदांनी प्रश्न विचारले होते. त्यांना प्रत्यक्ष बोलावून त्यांच्या शंकांचे निरसन केले होते व त्यांनी केलेल्या सूचनांबाबत माहिती सभेस दिली होती. यावर्षी ज्या सभासदांनी प्रश्न विचारले त्यांना लेखी स्वरुपात बँकेने उत्तरे दिली आहेत. तरी पुढल्या वर्षी याबाबत बँकेचे कोणते धोरण असेल ते स्पष्ट करावे.

त्यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की गेल्या वर्षी ज्या सभासदांनी पत्र पाठवून प्रश्न विचारले त्यांना प्रत्यक्ष बोलावून त्यांचे शंका समाधान केले होते. या वर्षी आपण सभासदांच्या प्रश्नांना लेखी स्वरुपात उत्तरे दिली आहेत. त्यावर सभासद श्री. अरुण शिंपी यांनी त्यांच्या प्रश्नांना कुठलेही उत्तर मिळाले नसल्याचे सांगितले. त्यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी स्पष्ट केले की, श्री. शिंपी यांनी उत्तराचे पत्र स्वीकरण्यास नकार दिला. तशी नोंद बँकेकडे आहे. यावर श्री. अरुण शिंपी यांचा प्रतिवाद होता की त्यांनी बँकेस यापूर्वी ४ पत्रे दिली त्यांची उत्तरे

अदयापपर्यंत मिळालेली नाहीत. परंतु यापत्राचे उत्तर लगेच दिले हे आश्चर्य आहे व सदर पत्र रात्री ८.०० च्या सुमारास त्यांना मिळाले हे कितपत योग्य आहे?

यानंतर सभासद श्री. विश्वास जोशी यांनी सभेस सांगितले की इतिवृत्तात त्यांच्या नावाचा उल्लेख आहे. परंतु गेल्या वर्षी ते सभेस उपस्थित नव्हते व त्यांच्या कोणत्याही शंकेचे निरसन बँकेने केलेले नाही. इतिवृत्तातील हे लिखाण धादांतपणे दिशाभूल करणारे व खोटे आहे. त्यावर मा. अध्यक्षांनी सांगितले की गेल्या वर्षी सभासदांना प्रत्यक्ष बोलावून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली होती व यावर्षी सभासदांच्याच सूचनेनुसार त्यांच्या प्रश्नांना लेखी स्वरुपात उत्तरे दिली आहेत.

परंतु श्री. जोशींनी हे खोडून काढताना सांगितले की ते गेल्या वर्षीच्या सभेसंदर्भात बोलत आहेत व गेल्या वर्षी शंका निरसनासाठी बोलावले नव्हते व ते सभेसही उपस्थित नव्हते त्यामुळे शंका समाधानाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. इतिवृत्तात चुकीचे लिहिले आहे व त्यास त्यांचा विरोध आहे.

त्यानंतर श्री. अक्षय पटवर्धन यांनी प्रश्न उपस्थित केला की, बँकेने त्यांना जे लेखी उत्तर दिले आहे. त्यात असे नमूद केले आहे की, अहवालासंदर्भात असलेल्या प्रश्नांची उत्तरे जर पत्रात असतील तर त्यांचा उल्लेख सभेत होणार नाही असे असेल तर त्यांनी जे प्रश्न विचारले ते सभेस कळणार कसे?

यावर समर्पक उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सभेस सांगितले की, श्री. अक्षय पटवर्धन यांचे प्रश्न वैयक्तिकरित्या विचारले होते त्यामुळे त्यांची उत्तरे वैयक्तिकरित्या दिली आहेत. सभेस ते कळण्याची आवश्यकता नाही. परंतु श्री. अक्षय पटवर्धन यांचे असे म्हणणे होते की हे प्रश्न सभासदांसाठी विचारले होते व त्यांनी नाराजी व्यक्त केली.

सभासद श्री. उदय दिक्षित यांनी संचालक मंडळास सांगितले की, वार्षिक सर्वसाधारण सभेत बँकेविषयीचा प्रश्न सर्व सभासदांना समजेल अशा वेळी ते विचारु शकतात व त्याचे उत्तर देणे बँकेस बंधनकारक आहे यांस दुजोरा देताना श्री. अक्षय पटवर्धन यांनी असे प्रश्न आधी घेताच कशाला? असा प्रतिप्रश्न केला.

मा. अध्यक्षांनी त्यांना सूचित केले की वार्षिक सर्वसाधारण सभेत या वर्षीच्या कामकाजासंदर्भातच चर्चा केली जाईल. श्री. उदय दिक्षित यांनी आपला मुद्दा मांडताना सांगितले की या सभेच्या नियमाप्रमाणे बँकेने ६ सप्टेंबरपर्यंत प्रश्न विचारण्यासाठी मुदत दिली होती. त्यांची उत्तरे बँकेने ७,८,९ तारखेपर्यंत दिली नाहीत तर १२ तारखेला संध्याकाळी ८.०० वाजता उत्तराचे पत्र घरी पाठविले. परंतु त्यात ज्या प्रकारे प्रश्नांची उत्तरे दिली आहेत ती चुकीची आहेत व शंकांचे निरसन केलेले नाही. तरी ते प्रश्न किती व कोणते व त्यास बँकेने कोणती उत्तरे दिली हे सभासदांपर्यंत पोहोचले पाहिजे.

त्यावर मा. अध्यक्षांनी स्पष्ट केले की श्री. उदय दिक्षित यांनी तोंडी प्रश्न विचारु नयेत, त्यांच्या प्रश्नांना लेखी उत्तर दिले आहे. परंतु श्री. उदय दिक्षित यांनी सांगितले की वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांना कोणतेही प्रश्न विचारता येतात व त्यांची उत्तरे देणे संचालक मंडळास बंधनकारक आहे.

यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी स्पष्ट केले की वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषयासंदर्भात प्रश्न असतील तर ते विचारता येतील. श्री. उदय दिक्षित यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यास लेखी स्वरुपात उत्तर दिले आहे. त्यामुळे त्या प्रश्नांची चर्चा करायची कोणतीही आवश्यकता नाही. तेव्हा दिक्षीत यांनी उत्तराची पत्रके काढून सभासदांना वाटण्यात येतील असे सांगितले. श्री. शिंपी प्रश्न विचारण्यासाठी उभे राहिले असता मा. अध्यक्षांनी त्यांचे म्हणणे संचालक मंडळाने नोंदवून घेतले असल्याचे सांगितले.

श्री. विश्वास जोशी यांनी सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला नसल्याचे सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी ठराव सर्वानुमते मंजूर झाला असल्याचे सांगितले. त्यास श्री. जोशींनी विरोध दर्शविला तेव्हा एका मा. सभासदांनी श्री. विश्वास जोशी, श्री. अरुण शिंपी, दिक्षित, अक्षय पटवर्धन यांच्या विरोधाची नोंद मा. संचालक मंडळाने घ्यावी असे सुचविले. त्यास उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सदर ठरावास विरोध आहे त्यांची नावे नोंद करुन घेतली असल्याचे सांगितले व तद्नंतर सभेने ४१ व्या वार्षिक सभेचे इतिवृत्त बहुमताने मंजूर करुन कायम केले.

ठराव क्र. १) रविवार दि. ०३.०८.२०१४ रोजी झालेल्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा.संचालक श्री. हेमल रवाणी यांनी सभेपुढे मांडले. त्यास ही सभा कायम करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. आनंद मालसे | सभासद क्र. १३०५७ |
| अनुमोदक : | श्री. अरुण काणे | सभासद क्र. ३४३० |

ठराव बहुमताने मंजूर.

यानंतर मा. अध्यक्षांनी बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांना अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सुचित केले व सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहण्याची विनंती केली.

**ठराव क्र. २ : दुखवटयाचा ठराव -**

अहवाल सालात ज्या मान्यवरांचे व सभासदांचे निधन झाले त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून ही सभा श्रध्दांजली वाहत आहे. माजी राष्ट्रपती, भारतरत्न, थोर शास्त्रज्ञ, भारताचे मिसाईल मॅन - डॉ. अब्दुल कलाम, महाराष्ट्र व गोव्याचे माजी राज्यपाल- मोहम्मद फझल, बिहार व केरळचे माजी राज्यपाल व ज्येष्ठ रिपब्लिकन नेते- रा. सू. गवई , माजी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री - मुरली देवरा, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री - बॅ. ए. आर. अंतुले, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री व गृहमंत्री- आर. आर. पाटील, माजी मंत्री व माजी खासदार- गोविंदराव आदिक, माजी खासदार -किसनराव बाणखेले, माजी कामगारमंत्री - साबीर शेख, समाजवादी नेते-कॉ. गोविंद पानसरे, ज्येष्ठ शास्त्रज्ञ व अवकाश तंत्रज्ञान क्षेत्राचे शिल्पकार - डॉ. वसंतराव गोवारीकर, प्रख्यात व्यंगचित्रकार- आर. के. लक्ष्मण, ग्राहक चळवळीचे प्रणेते -बिंदुमाधव जोशी, पद्म व ज्ञानपीठ पारितोषिक विजेते, प्रख्यात साहित्यिक - यू. आर. अनंतमूर्ती, राष्ट्र सेविका समितीच्या अखिल भारतीय कार्यवाहिका, भारतीय स्त्री जीवन विकास परिषदेच्या संस्थापिका - बकुळताई देवकुळे, सारस्वत को-ऑप बँकेचे अध्यक्ष - एकनाथ ठाकुर, निर्माती, दिग्दर्शिका, अभिनेत्री - स्मिता तळवलकर, व्यंगचित्रकार - प्राण शर्मा, ज्येष्ठ पत्रकार व लेखक - ब. ना. जोग,

योगाचार्य - बी. के. एस्. अय्यंगार, आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या चित्रकार- नेत्रा साठे, प्रसिध्द मेंडोलिनवादक - यू. श्रीनिवास, ज्येष्ठ भाषा शास्त्रज्ञ, समीक्षक- डॉ. अशोक केळकर, कवीवर्य - शंकर वैद्य, ज्येष्ठ अभिनेते - सदाशिव अमरापूरकर, सुप्रसिध्द कथ्थक नृत्यांगना - सितारादेवी, अभिनेत्री- नयनतारा, हास्य अभिनेता - देवेन वर्मा, अभिनेता - श्याम पोंक्षे, अभिनेत्री - बेबी शंकुतला, ज्येष्ठ अभिनेते - आत्माराम भेंडे, ज्येष्ठ गायिका - कृष्णा कल्ले, ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ- निनाद बेडेकर, ज्येष्ठ गायिका- वसुंधरा कोमकली, ज्येष्ठ नाटय अभिनेते - भालचंद्र पेंढारकर, नाटककार - प्र. ल. मयेकर, ज्येष्ठ विचारवंत - एम. एम. कलबुर्गी, संगीत दिग्दर्शक - आदेश श्रीवास्तव.

## दिवंगत सभासदांची यादी

| अनु. क्र. | सभासद क्र. | सभासदांचे नाव | मृत्यु दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ४०५५३ | गोडघाटे महेश उद्धवराव | २०.०४.२०१४ |
| २ | ३१८१५ | द्विवेदी राजेंद्र प्रसाद | २०.०४.२०१४ |
| ३ | २५८०७ | सुर्वे मालतीबाई बाळकृष्ण | २४.०४.२०१४ |
| ४ | १७७९२ | वाघमारे नलिनी शंकर | २४.०४.२०१४ |
| ५ | २३१९२ | शिरामे दुर्गादास शिवराम | २७.०४.२०१४ |
| ६ | २०९३ | जयवंत मंगला कमलाकर | ०५.०५.२०१४ |
| ७ | ३२०२९ | टोणपे गोविंदराज | १९.०५.२०१४ |
| ८ | ४७५९ | पुरोहित राजेंद्र विष्णुप्रसाद | २१.०५.२०१४ |
| ९ | २२८१५ | मरीयन मायकल ॲन्थनी | २२.०५.२०१४ |
| १० | ४८३९ | दोशी हसमुखराय गुलाबचंद | २६.०५.२०१४ |
| ११ | ४२८३१ | सरदार पांडुरंग शामराव | ३०.०५.२०१४ |
| १२ | ३७१६५ | रहाटे दीपक अंबादास | ०२.०६.२०१४ |
| १३ | १३५०२ | चव्हाण छगन प्रेमजी | १०.०६.२०१४ |
| १४ | २०४९८ | परमार बच्चू भिका | २४.०६.२०१४ |
| १५ | १२०९३ | अजबे पांडुरंग हरी | २५.०६.२०१४ |
| १६ | २०७४५ | टिळक मीना सतिश | २९.०६.२०१४ |
| १७ | १५२९५ | बिवलकर नारायण कृष्णाजी | ०२.०७.२०१४ |
| १८ | ४२२१ | कोरडे लक्ष्मण बाळाराम | ०७.०७.२०१४ |
| १९ | ३४१७ | पाटे उपेंद्र गंगाधर | १०.०७.२०१४ |
| २० | ४८८१७ | जोशी लता रत्नाकर | ११.०७.२०१४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | १४४७५ | कर्डक मधुकर भाऊ | १४.०७.२०१४ |
| २२ | २३२३१ | काटकर रामदास भिकाजी | १९.०७.२०१४ |
| २३ | ३७८८ | खंगार विजय नारायण | २१.०७.२०१४ |
| २४ | १९७०५ | जाधव विजय शांताराम | २५.०७.२०१४ |
| २५ | ५४४५ | कुलकर्णी भास्कर गणेश | २८.०७.२०१४ |
| २६ | ४१५३५ | सरदेसाई मुक्ता गोपाळ | ३०.०७.२०१४ |
| २७ | ५२८०१ | कुलकर्णी सुलभा सुरेश | ३१.०७.२०१४ |
| २८ | ११४४७ | सावंत शुभा गजानन | ३१.०७.२०१४ |
| २९ | २२३१८ | सोहोनी केशव श्रीधर | १९.०८.२०१४ |
| ३० | ४२३१ | काळे नारायण चिंतामण | २१.०८.२०१४ |
| ३१ | १९०४४ | ओवळेकर रमाकांत हरीशंकर | २१.०८.२०१४ |
| ३२ | ११३४२ | महाजन सुभाष इच्छाराम | २२.०८.२०१४ |
| ३३ | १०६९३ | देसाई प्रदीप महादेव | २४.०८.२०१४ |
| ३४ | २७९४१ | माळगांवकर सदाशिव विठोबा | २५.०८.२०१४ |
| ३५ | ५३७६० | कोंडार गोविंद शंकर | २६.०८.२०१४ |
| ३६ | ३४१५८ | महाडीक प्रकाश गंगाराम | ३१.०८.२०१४ |
| ३७ | ७४ | जोशी शिवराम भालचंद्र | २१.०९.२०१४ |
| ३८ | ३७१७६ | घनवट अजित दशरथ | २२.०९.२०१४ |
| ३९ | ३३९९९ | कथले प्रणेश पुरुषोत्तम | २७.०९.२०१४ |
| ४० | ९५०२ | मोगरा सजन जगदीश | २८.०९.२०१४ |
| ४१ | ३२८४६ | अमीन सुरेखा विनोद | २७.१०.२०१४ |
| ४२ | ४९२३ | तमीजा खातुन युसुफ शेख | ०१.११.२०१४ |
| ४३ | १३९५१ | पटेल लक्ष्मण भुरालाल | ०२.११.२०१४ |
| ४४ | ४५७९२ | चौधरी भोजराज रघुमल | ११.११.२०१४ |
| ४५ | ५९५६ | ऑलिवर ॲन्थोनी डिमेलो | २४.११.२०१४ |
| ४६ | ८२५३ | तमांग किसनबहादुर कालूसिंग | १२.१२.२०१४ |
| ४७ | १८९२८ | फडके सुहास भालचंद्र | १२.१२.२०१४ |
| ४८ | २३६०७ | भारंबे भागवत यादव | १४.१२.२०१४ |
| ४९ | ४३९४५ | साखरे भास्कर पंडीत | १८.१२.२०१४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | ११८०३ | बोरसे ईश्वर राजाराम | २९.१२.२०१४ |
| ५१ | ४४५८ | भराडे अनंत धोंडोजी | ०७.०१.२०१५ |
| ५२ | १७२५१ | भिडे नारायण दामोदर | २८.०१.२०१५ |
| ५३ | ३०३४९ | काळे अविनाश रंगनाथ | २९.०१.२०१५ |
| ५४ | १०५८२ | चव्हाण मनोहर धोंडीराम | ०२.०२.२०१५ |
| ५५ | ४१४९६ | नेवासकर यादव शामराव | ०४.०२.२०१५ |
| ५६ | १६०८६ | अभ्यंकर सदानंद धोंडो | ०४.०२.२०१५ |
| ५७ | ९१८६ | चावरे सहदेव अवधुत | १९.०२.२०१५ |
| ५८ | ८८०८ | बेदींग गुरमेलसिंग जरनेलसिंग | २७.०२.२०१५ |
| ५९ | ५१२५८ | पाटील तुकाराम मोतीराम | ०५.०३.२०१५ |
| ६० | ४०७२ | जोशी रमेश एकनाथ | ०७.०३.२०१५ |
| ६१ | ३१७८३ | भट्टाचार्जी हिषीकेश | १२.०३.२०१५ |
| ६२ | ५७०२ | उदास शरद मुरलीधर | १९.०३.२०१५ |
| ६३ | १२७९७ | सोलंकी तुलसा मोहन | ३०.०३.२०१५ |
| ६४ | ४५८१ | परदेशी रामचंद्र शंकर | ०७.०४.२०१५ |
| ६५ | ४७०५४ | कतिरा महेश कल्याणजी | १२.०४.२०१५ |
| ६६ | ५०९९७ | आळशी सागर संतोष | १३.०४.२०१५ |
| ६७ | १८७६९ | देशपांडे पुष्पा रघुनाथ | ०४.०५.२०१५ |
| ६८ | १०५८९ | वसाणे शेषराव उखर्डु | ११.०५.२०१५ |
| ६९ | ८९४७ | उपासे शरणप्पा राचप्पा | १९.०५.२०१५ |
| ७० | १९११८ | जोशी आशा भालचंद्र | २१.०५.२०१५ |
| ७१ | १९५०० | खिरवडकर नारायण रामचंद्र | २८.०५.२०१५ |
| ७२ | ६७६३ | मुदलियार पुष्पा सुब्रमणी | २९.०५.२०१५ |
| ७३ | १४९५२ | ओक प्रतिभा पद्माकर | ०७.०६.२०१५ |
| ७४ | १४६०८ | कंक प्रदिप मनोहर | १८.०६.२०१५ |
| ७५ | ४४८०४ | निमसे काशिनाथ दत्तात्रय | ११.०७.२०१५ |
| ७६ | ६७७ | पष्टे सिताराम हरी | १२.०७.२०१५ |
| ७७ | ४३३२ | कुलकर्णी शरद भास्कर | १६.०७.२०१५ |
| ७८ | ७३८५ | राय किरण हिराप्रसाद | ३०.०७.२०१५ |

गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करुन ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, अशी प्रार्थना करण्यात आली.

यानंतर मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी सर्व उपस्थित सभासदांचे पुन्हा एकदा स्वागत केले. बँकेच्या संचालक मंडळाची मे - २०१५ मध्ये निवडणूक झाली. या निवडणूकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा परिचय त्यांनी करुन दिला. यावेळी नव्याने निवडून आलेल्या संचालकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व निवृत्त संचालक श्री. श्रीनिवास फणसे, श्री. लक्ष्मीकांत उपाध्याय, ॲड. निशीकांत बुधकर, श्री. अनिरुध्द जाधव यांनी बँकेच्या कामात दिलेल्या योगदानाबाबत त्यांचा सत्कार करण्यात आला.

**विषय : सन २०१४-२०१५ सालातील बँकेच्या कामकाजाबाबत संचालक मंडळाच्या वतीने सादर केलेल्या वार्षिक अहवालाची नोंद घेणे.**

बँकेचे अध्यक्ष मा. ॲड. सुरेश पटवर्धन यांचे अध्यक्षीय भाषण झाले. दृकश्राव्य माध्यमातून त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

भाषणाची सुरुवात करतानाच मा. अध्यक्षांनी सांगितले की 'One Team One Aim' हे आपल्या बँकेचे ध्येय आहे. सांघिकरित्या बँकेला वैभवशिखरावर नेणे हेच आपले ध्येय आहे.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीपथाचा आढावा सभेसमोर सादर केला. २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षांचा तौलनिक आढावा घेतला. बँकेच्या सभासद संख्येमध्ये मागील आर्थिक वर्षात ४२८४ ने वाढ झालेली आहे. सभासद संख्या ४३७९१ वरुन ४८९७५ झाली आहे.

भागभांडवल ₹ ५५.६० कोटी होते ते ₹ ६१.३८ कोटी झाले आहे. राखीव निधी ₹ १२२.९० कोटीवरुन ₹ १२७.३७ कोटी झाले आहेत.

बँकेच्या एकूण ठेवी २०१३-१४ या आर्थिक वर्षअखेरीस ₹ १५८९.९५ कोटी होत्या त्यामध्ये वाढ होऊन २०१४-१५ आर्थिक वर्षअखेर ₹ १९०५.९२ कोटी इतक्या झाल्या आहेत. ठेवींमध्ये १९.८७% वाढ झालेली आहे. बँकेची एकूण कर्जे २०१३-१४ अखेर ₹ ११२०.२९ कोटी होती त्यामध्ये वाढ होऊन २०१४-१५ अखेर एकूण कर्ज ₹ १३३६.६३ कोटी इतकी झाली आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत कर्जांमध्ये १९.३१% इतकी वाढ झाली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy) प्रमाण ९% पेक्षा अधिक असले पाहिजे. बँकेने २०१४-१५ अखेर भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.३२% इतके राखलेले आहे.

बँकेचा निव्वळ नफा सन २०१३-१४ साली ₹ १८.१३ कोटी होता, सन २०१४-१५ यावर्षी निव्वळ नफा ₹ २२.०४ कोटी इतका झालेला आहे. नफ्यामध्ये २१.५३% वाढ झालेली आहे.

सन २०१३-१४ साली कर्मचारी उत्पादकता ₹ ६.७१ कोटी होती त्यामध्ये वाढ होऊन यावर्षी ₹ ७.२४ कोटी इतकी आहे. कर्मचारी उत्पादकता ७.८९% नी वाढली आहे.

बँकेच्या ढोबळ अनुत्पादित कर्जाचे (Gross NPA) प्रमाण २.७२% वरुन २.५८% पर्यंत खाली आलेले आहे. निव्वळ अनुत्पादित कर्जे (Net NPA) सन २०१३-१४ मध्ये ०% होती, त्याचे प्रमाण हयावर्षी ०.४९% एवढे आहे.

आपल्या बँकेचा एकत्रित व्यवसाय (Mix Business) जर बघितला, तर २०१०-११ ला आपला एकत्रित व्यवसाय १५४६ कोटी होता, तो २०११-१२ ला १९०९ कोटी झाला. २०१२-१३ ला २९४० कोटी २०१३-१४ ला २७१० कोटी तर २०१४-१५ अखेरीस ₹ ३२४३ कोटी इतका झालेला आहे.

यानंतर ठेवी व कर्जांच्या वाढीबाबतचा आढावा घेण्यात आला.

एकूण ठेवी २०१०-११ ला ₹ ९०७ कोटी, २०११-१२ ला ₹ ११०७ कोटी, २०१२-१३ ला ₹ १३०९ कोटी, २०१३-१४ ला ₹ १५९० कोटी तर २०१४-१५ ला ₹ १९०६ कोटी इतक्या झालेल्या आहेत.

एकूण कर्जे २०१०-११ ला ₹ ६३९ कोटी इतकी आहे. २०११-१२ ला ₹ ८०९ कोटी, २०१२-१३ ला ₹ ९२१ कोटी, २०१३-१४ ला ₹ ११२० कोटी आणि २०१४-१५ ला ₹ १३३७ कोटी कर्जे झाली आहेत. २०१४-१५ ला एकत्रित व्यवसाय ₹ ३२४३ कोटी इतका झाला आहे.

अग्रक्रम क्षेत्रातील कर्जांचे प्रमाण यावर्षी ४०.६२% इतके आहे आणि इतर बँकांबरोबर सहभाग(Consortium) कर्जाचे प्रमाण १७.३६% आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार कोणत्याही बँकेचे ढोबळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ७% पेक्षा कमी असावे लागते. आपल्या बँकेची ढोबळ अनुत्पादित कर्जे सन २०१३-१४ साली २.७२% इतकी होती या वर्षी हे प्रमाण २.५८% इतके आहे. २०१४-१५ मध्ये ढोबळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण बऱ्याच प्रमाणत घटले आहे.

२०१०-११ साली ढोबळ अनुत्पादित कर्जे ४.०७%, २०११-१२ साली ३.१९%, २०१२-१३ ला ३.७४% तर २०१३-१४ ला २.७२% इतकी होती. २०१४-१५ साठी हे प्रमाण २.५८% इतके घटलेले आहे.

आर्थिकदृष्टया सक्षम व सुव्यवस्थापित बँकांसाठी असलेले रिझर्व्ह बँकेचे जे मापदंड आहेत ते सभेस समजावून सांगितले.

आर्थिकदृष्टया सक्षम व सुव्यवस्थापित असलेले रिझर्व्ह बँकेचे सर्व मापदंड आपल्या बँकेने पाळलेले आहेत. भांडवल पर्याप्तता प्रमाण, Gross NPA, Net NPA चे प्रमाण, सतत तीन वर्षे नफा, CRR व SLR ची पातळी हे मापदंड रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार पूर्ण केले आहेत.

दि. ०३.०८.२०१४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल सालाकरिता वैधानिक लेखापरीक्षणासाठी मे. वैशंपायन अँड पाध्ये या CA फर्मची नियुक्ती केली होती आणि त्यांनी त्यांचा लेखापरीक्षण अहवाल सादर केला असून सन २०१४-१५ सालाकरिता बँकेला लेखापरीक्षणाचा 'अ' वर्ग दिला आहे.

हे सगळे आर्थिक निकष पाळत असताना, कर्मचाऱ्यांचे योगदानही महत्त्वाचे ठरते.कर्मचाऱ्यांच्या उत्पादकतेमध्ये ७.८९% वाढ होऊन यावर्षी कर्मचारी उत्पादकता ₹ ७.२४ कोटी इतकी झालेली आहे.

कर्मचाऱ्यांच्या उत्पादकतेतही वाढ चांगल्या प्रमाणात झालेली दिसून येत आहे.

संगणकीकरण व तंत्रज्ञान याविषयी माहिती देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की नुकतेच २३ ऑगस्ट २०१५ रोजी बँकेचे इंटरनेट बँकिंग व मोबाईल बँकिंग या दोन सेवांचे उद्‌घाटन डॉ. दीपक फाटक व डॉ. आनंद देशपांडे यांच्या हस्ते कल्याण स्पोर्टस् क्लब 'वाधवा हॉल' येथे झालेले आहे. तंत्रज्ञानाच्या बाबतीत देखील आपली बँक प्रगतीपथावर आहे. तंत्रज्ञानाच्या सर्व सुविधांचा अवलंब बँकेने सभासदांसाठी ,खातेदारांसाठी केला आहे.

बँकेची CBS प्रणाली २००६ मध्ये सुरु झाली. RTGS/NEFT हया सुविधा २००८ पासून सुरु झाल्या. बँकेचे अद्ययावत Data Center आणि DR Site २०१० साली सुरु झाले. CTS Clearing ची सेवा २०१३ ला सुरु झाली. Rupay Debit Card २०१४ पासून खातेदारांना उपलब्ध करुन दिले. Social Media Channel म्हणजेच Facebook, Twitter, Google, You tube हया सर्व माध्यंमाद्वारे आपण बँकेची माहिती देतो व जाहिरात करतो, ह्याची सुरुवात २०१५ मध्ये झालेली आहे.

बँकिंग व्यवसायाव्यतिरिक्त आपण विमा व्यवसायही करतो. २०११ पासून Kotak Mahindra Old Mutual Life Insurance आणि २०१४ पासून New India Assurance Company हया देशातील मोठया विमा कंपन्यांचे आपण Corporate Agent म्हणून कार्यरत आहोत आणि तसेच भारत सरकारतर्फे सुरु करण्यात आलेल्या पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेअंतर्गत ८९६३ व पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेअंर्तगत ४७५२ खातेदारांनी नोंदणी करुन या योजनेचा लाभ घेतला आहे हे सांगण्यास आम्हांला आनंद वाटतो.

आपल्या सर्वांना माहितच आहे की जगातील भांडवली बाजारात सध्या प्रचंड अस्थिरता आहे. चीनसारख्या बलाढय देशाने त्यांच्या चलनाच्या मूल्यात घट केली आहे. त्यामुळे जगभरातील भांडवली बाजारात त्याचे परिणाम दिसत आहेत. हया सर्व बाबींचा परिणाम रोखे बाजारावर होत असून, भारतीय रिझर्व्ह बँक, पुढील काळात कोणती पाऊले उचलेल हयाचा अंदाज सांगता येत नाही. त्यामुळे हयावर्षी गुंतवणूकीच्या खरेदी विक्रीवर ₹ ५.८८ लाख कोटी नफा झाला असला तरी तो पुढील वर्षी हयाच प्रमाणात होईल हयाची खात्री देता येत नाही. बाजारातील ही अस्थिरता आपल्या नफ्यावर परिणाम करु शकेल हयाची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.

बँकेच्या पुढील विस्ताराबाबत माहिती देताना अध्यक्षांनी सांगितले की, बँकेच्या सध्या एकूण ३४ शाखा आहेत. नुकतेच १० सप्टेंबर २०१५ रोजी पनवेल येथे ३४ व्या शाखेचे उद्‌घाटन स्थानिक आमदार

श्री. प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या नंतरच्या प्रस्तावित शाखांमध्ये कल्याण जवळील कोन गाव, डोंबिवली (पूर्व), पुण्यातील बिबवेवाडी व वारजे येथील शाखा आहेत. त्याशिवाय पुण्याला वाघोली आणि अप्पा बळवंत चौक येथे नवीन शाखा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे नाशिक येथे दुसरी व विरार येथेही शाखा सुरु करणार आहोत.

यानंतर अहवाल वर्षात बँकेला जे विविध पुरस्कार मिळाले त्याची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली.

१. दि. १९.०६.२०१५ रोजी महाराष्ट्राचे महसूल मंत्री मा. श्री. एकनाथजी खडसे यांच्या हस्ते महाराष्ट्र शासनाच्या सन २०१३-१४ साठीचा 'सहकार भूषण' हा पुरस्कार आपल्या बँकेस प्राप्त झाला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्राचे सहकार मंत्री मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी भूषिवले होते.

२. दि. २७.०९.२०१४ रोजी दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनचे संचालक श्री. सत्यनारायण लोहिया व श्री. कैलाशचंद्र अग्रवाल यांच्या हस्ते 'Best Bank Award' हा तृतीय पुरस्कार बँकेस प्राप्त झाला आहे.

३. 'Banking Frontier' मासिकातर्फे Best NPA Management यासाठी प्रथम पुरस्कार दि. ०१.११.२०१४ रोजी बँकेस मिळाला आहे.

४. दि. ११.१२.२०१४ रोजी नॅफकबचे अध्यक्ष मा.डॉ. मुकुंदराव अभ्यंकर यांच्या हस्ते, 'बँको' मासिकातर्फे मोठया बँकांच्या गटात Best Bank Award हा प्रथम पुरस्कार बँकेस प्राप्त झाला आहे. मा. अध्यक्षांनी २०१५ सालाकरिताही बँको पुरस्कार आपल्या बँकेस जाहीर झाला असल्याचे सांगितले. सदर पुरस्कार ऑक्टोबर, २०१५ मध्ये प्रदान करण्यात येईल.

५. सहकार सुगंध मासिकातर्फे दरवर्षी वार्षिक अहवाल स्पर्धा घेतली जाते. सन २०१३-१४ च्या आपल्या बँकेच्या वार्षिक अहवालास द्वितीय पुरस्कार मिळाला आहे. सदर पुरस्कार महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष मा. श्री. शेखर चरेगावकर यांच्या हस्ते दि. १८.०४.२०१५ रोजी प्रदान करण्यात आला.

यानंतर मा. अध्यक्षांनी अहवाल वर्षातील ठळक व उल्लेखनीय घटनांबाबत सभेस माहिती दिली.

बैलबाजार शाखेचे नवीन वास्तूमध्ये स्थलांतर तसेच ATM चे उद्घाटन दि. २५.१२.२०१४ रोजी महाराष्ट्राचे गृहनिर्माण व कामगार मंत्री मा. श्री. प्रकाश मेहता यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास कल्याण पश्चिमचे मा. आमदार श्री. नरेंद्र पवार हे देखील उपस्थित होते.

सभासद प्रशिक्षणांतर्गत दोन व्याख्याने आयोजित केली होती. पहिले व्याख्यान दि. १२.०७.२०१४ रोजी 'अर्थसंकल्प २०१४' आयोजित केले होते. प्रख्यात चार्टर्ड अकाऊंटंट श्री.मंगेश किनरे आणि दै. लोकसत्ताचे संपादक श्री. गिरीश कुबेर हे व्याख्याते म्हणून या कार्यक्रमास लाभले होते.

दुसरे व्याख्यान २०१५ च्या अर्थसंकल्पावरील होते. दि. ०४ मार्च २०१५ रोजी झालेल्या या व्याख्यानास ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ डॉ. अभिजीत फडणीस यांचे मार्गदर्शन लाभले होते.

डोबिंवली जिमखाना तर्फे डोंबिवली जिमखाना येथे दरवर्षी डोंबिवली उत्सवाचे आयोजन केले जाते. २०१४ मध्ये बँकेने या उत्सवात स्टॉल लावला होता व त्यास चांगला प्रतिसाद लाभला.

नववर्ष स्वागतयात्रा सर्वप्रथम डोंबिवली येथे सुरु झाली. दरवर्षी डोंबिवलीत नववर्ष स्वागत यात्रेचे आयोजन केले जाते. यावर्षी गुढीपाडव्याच्या स्वागत यात्रेत बँकेने 'विविधतेतून एकता' या विषयावर चित्ररथ करुन सहभाग घेतला होता.

२० ऑगस्ट २०१५ रोजी Negotiable Instrument Act मधील दुरुस्तीनुसार भारत सरकारने या कायद्याच्या कलम २५ अंतर्गत प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी बँकांना सार्वजनिक सुट्टी राहिल व इतर शनिवारी बँकांचे कामकाज पूर्णवेळ होईल असे जाहीर केले आहे. आपल्या बँकेच्या बरोबरच्या इतर सहकारी बँकांनी दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सुट्टी जाहीर केली आहे.

आपल्या बँकेने वेगळा विचार करताना दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सुट्टी दिल्यास ग्राहकांची गैरसोय होईल म्हणून बँकेने कर्मचारी संघ व अधिकारी असोसिएशन यांच्याबरोबर या विषयावर चर्चा केली आणि कर्मचारी संघ व अधिकारी असोसिएशन या दोन्ही संघटनांनी सध्या आहे त्याप्रमाणे सर्व शाखांचे कामकाज सुरु ठेवण्यास संमती दिली आहे. तसे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांना याबाबत सूचित केले आहे. सबब इतर सर्व बँका बंद असतांना आपल्या बँकेच्या सभासद व ग्राहकांना दुसऱ्या व चौथ्या शनिवारी देखील ग्राहक सेवा मिळणार आहे.

सभासद कल्याण निधी अंतर्गत दरवर्षी सभासदांच्या पाल्यांना विदयार्थी प्राविण्य पुरस्कार देण्यात येतो. दि. २९.०७.२०१४ रोजी झालेल्या विदयार्थी प्राविण्य पुरस्कार वितरण कार्यक्रमास 'आदर्श महाविदयालय' बदलापूर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सौ. वैदेही दफ्तरदार या उपस्थित होत्या.

आपल्या बँकेला जो निव्वळ नफा होतो त्या नफ्याच्या १% रक्कम आपण 'धर्मादाय निधी' म्हणून वितरण करु शकतो. 'धर्मादाय निधी वितरणाचा' कार्यक्रम भारतीय जनता पक्षाचे आमदार मा.श्री. अतुल भातखळकर यांच्या हस्ते दि. २२.०३.२०१५ रोजी करण्यात आला.

यापूर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे दि. २३.०८.२०१५ रोजी Internet Banking आणि Mobile Banking सेवांचे उद्घाटन वाधवा हॉल येथे झाले.

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर दि. २१.०४.२०१५ रोजी बँकेच्या ३१ व्या तळेगाव शाखेचे उद्घाटन संपन्न झाले.

बँकेच्या नांदिवली-मलंग रोड शाखेचे उद्घाटन दि. ०१.०८.२०१५ रोजी मुरबाड विभागाचे आमदार श्री. किसन कथोरे यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कल्याण पूर्व तालुक्यातील संघचालक डॉ. विवेक मोडक हे उपस्थित होते.

दि. ३०.०८.२०१५ रोजी बँकेच्या टिटवाळा शाखेचे उद्‌घाटन झाले. सदर उद्‌घाटन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे उपमहापौर श्री. राहूल दामले, स्थानिक नरसेविका सौ. उपेक्षा भोईर व टिटवाळा महागणपती मंदिराचे विश्वस्त श्री. सुभाष जोशी यांचे हस्ते झाले.

दृकश्राव्य माध्यमातील अध्यक्षीय भाषण त्यांनी सर्व सभासदांना धन्यवाद देऊन संपविले.

सभासद श्री. उदय दिक्षीत यांनी बँकेने केलेल्या कार्यक्रमासंदर्भात प्रश्न विचारताना को-ऑप. हौ. सोसायटी खातेदारांसाठी जे सॉफ्टवेअर Develop केले व एका कार्यक्रमात तसे जाहीर केले. परंतु को-ऑप. हौ. सोसायटयांपर्यंत ते सॉफ्टवेअर पोहोचले नाही व त्याचा फायदा त्यांना मिळाला नाही असे सांगितले. त्यावर मा. संचालक श्री. आघारकर यांनी समर्पक उत्तर दिले. काही को-ऑप. हौ. सोसायटयांनी या सॉफ्टवेअरचा फायदा घेतला असून ज्यांना या सॉफ्टवेअरचा फायदा घ्यायचा आहे ते बँकेत येऊन त्याविषयी माहिती करुन घेतात. मा. संचालक श्री. आघारकरांनी पुढे असे सांगितले की, तांत्रिकदृष्टया हा गेल्या वर्षीचा विषय आहे.

सभासद श्री. अरुण शिंपी यांनी असे विचारले की, १९९५ साली आपल्या बँकेला टिटवाळा येथे शाखा उघडण्याची परवानगी मिळाली होती, तरी ती उघडण्यास उशीर झाला का? हया प्रश्नास मा. अध्यक्ष ॲड. पटवर्धन यांनी सदर माहिती चूकीची असल्याचे सांगितले व टिटवाळा शाखेची परवानगी २०१५ साली मिळाली असल्याचे सांगितले.

सभासद श्री. गोविंद वागे सभासद क्र. १९०१० यांनी बँकेचे संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग, अधिकारी वर्ग व सर्व ठेवीदार यांचे अभिनंदन केले. आपल्या देशावर आर्थिक संकटाचे सावट पडून देखील आपण मागील वर्षापेक्षा २१.५३% अधिक नफा मिळवला आहे याचे श्रेय संचालक मंडळास दिले. तसेच आपण सर्व सभासदांना १५% लाभांश दिलेला आहे त्याबद्दल संचालक मंडळाचे अभिनंदन केले.

सभासद श्री. अक्षय पटवर्धन यांनी बैलबाजार शाखा नवीन जागेत स्थलांतरीत केली, परंतु जुने मुख्य कार्यालय जेथे होते, त्या निहारिका इमारतीत ती का स्थलांतरीत करण्यात आली नाही? याबाबत अध्यक्षांनी माहिती दिली कि आपली बैलबाजार शाखा श्री. ओक यांचे जागेत होती ती नविन जागेत स्थालांतरित केलेली आहे बँक निहारीका येथील जागेचे दरमहा ₹ २.५० लाख भाडे का भरत आहे असेही श्री. पटवर्धन यांनी विचारले.

सभासद श्री. दिक्षीत हयांनीही वरील प्रश्नांना अनुमोदन देत बँक निहारीका हया जागेचे गेली ८ महिने वापरात नसतानाही ₹ २.५० लाख का भरत आहे असे विचारले. यास उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले, निहारिका येथील जागेचा या विषयाशी कोणताही संबंध नाही.

तसेच श्री. अक्षय पटवर्धन यांनी भारताचार्य वैद्य चौकातील इमारतीत आपले प्रशिक्षण केंद्र असतांना देखील नविन जागेत प्रशिक्षण केंद्र का घेतले असा प्रश्न विचारला.

प्रशिक्षण केंद्राबाबतचा प्रश्न हा आता मांडलेल्या विषयास अनुसरुन नसल्याचे सांगितले. सदर प्रश्न आयत्यावेळी येणाऱ्या विषयांमध्ये समाविष्ट करावा असे मा. अध्यक्षांनी श्री. अक्षय पटवर्धन यांना सांगितले.

ठराव क्र. ३) सन २०१४-१५ सालातील बँकेच्या कामकाजाबाबत संचालक मंडळाच्या वतीने मा. अध्यक्ष अॅड. सुरेश पटवर्धन यांनी सादर केलेल्या वार्षिक अहवालाची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. मंगेश लक्ष्मणराव पाटील | सभासद क्र. १७१२० |
| अनुमोदक : | श्री. श्रीकृष्ण शंकर पाटील | सभासद क्र. १२१०४ |

ठराव बहुमताने मंजूर.

या सभेस आत्तापर्यंत साधारण ८७५ सभासद उपस्थित आहेत. त्यामुळे सभासद संख्येतील वाढ लक्षात घेता मा. अध्यक्षांनी पुढील वर्षी वार्षिक सर्वसाधारण सभा योग्य अशा मोठया हॉलमध्ये घेण्याचे आश्वासन सभासदानां दिले.

यानंतर पुढील विषय क्र. ३, ४, ५ हे वैधानिक लेखापरीक्षणासंदर्भात असून ते मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. तज्ज्ञ संचालक श्री. सचिन आंबेकर यांना सांगितले.

मा. तज्ज्ञ संचालक श्री. सचिन आंबेकर यांनी मे. वैशपांयन अॅण्ड पाध्ये यांनी तपासलेले दि. ३१ मार्च २०१५ अखेरचे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक वाचून दाखविले व सविस्तरपणे समजावून सांगितले. याबाबत माहिती देतांना सांगितले की संचालक मंडळाने सादर केलेले व वैधानिक लेखापरीक्षक यांनी तपासलेले मार्च अखेरचे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व लेखापरीक्षकांचा अहवाल तसेच मागील वर्षीच्या लेखापरीक्षंकाच्या अहवालावरील दोषदुरुस्ती अहवाल सहकार खात्याला सादर केला जातो. तसेच तो निबंधक सहकारी संस्था पुणे यांना सादर केला जातो. आपणास जो अहवाल दिलेला आहे, त्यात नफा तोटा पत्रक, ताळेबंद असून त्यामध्ये ठेवी, कर्जे याबाबतची माहिती दिली आहे. त्यामधील झालेली वृध्दि मा. अध्यक्षांच्या भाषणात सविस्तर आलेली आहे. सन २०१४ -१५ या मागील वर्षीबाबत रिझर्व्ह बँकेने दिलेल्या अहवालामध्ये देशातील व्यवसाय वृध्दी ७.३ % झालेली आहे. यामध्ये Manufacture Sector हे ७.१०%, Service Sector साधारण ११ ते ११.५% तर Trade व Hotel Industry साधारण १०% ते १०.५% ने वाढली ही प्रगती सकारात्मक दिसते. परंतु, आपण जर बघितले तर याच अहवालात रिझर्व्ह बँक म्हणते की याच्या बरोबर उलट परिणाम हा शेती बाबत झालेला आहे. शेतीची वृध्दि फक्त ०.२% झाली. याच्या बरोबरच या वृध्दिबाबतचा अहवाल केंद्र सरकारला म्हणजेच आपल्या Finance Ministry ला सुध्दा द्यावा लागतो. CRISIL नावाची रेटींग करणारी संस्था आहे त्यांनी एक अहवाल दिला आहे. त्यात त्यांनी देशभरातील बँकांचे NPA चे प्रमाण ६% पर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली आहे.

याबरोबरच आपल्या बँकेच्या कर्ज, व्याजाचे उत्पन्न, गुंतवणूकीवरील उत्पन्नाची वाढ, इतर उत्पन्न याबाबत सविस्तर माहिती सभेस दिली.

१. यानंतर बँकेचे माजी संचालक श्री. वामनराव साठे यांनी विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ८ बद्दल आपले म्हणणे मांडले. बँकेने १९९७-१९९८ साली बँकेचा रौप्य महोत्सव व देशाचा स्वातंत्र्य दिनाचा सुवर्ण महोत्सव मोठया प्रमाणात साजरा केला होता. २०२३ साली बँकेचे सुवर्ण वर्ष व देशाच्या स्वातंत्र्य दिनाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. सदर अमृत महोत्सवी वर्ष आपल्या बँकेने

रौप्य महोत्सवी वर्षाप्रमाणे मोठया प्रमाणात साजरा करावा असे सुचित केले. सदर महोत्सवी वर्षामधील विविध कार्यक्रम व उपक्रमासाठी बँकेने महोत्सव निधी वाढविण्याची आवश्यकता आहे. सबब बँकेने महोत्सव निधी ₹ २ ते ₹ २.५ कोटी करावा असे सुचविले. दि. ३१ मार्च २०१५ अखेरीस लाभांश समानीकरण निधी ₹ २६.८० लाख आहे. बँक सातत्याने नफा करीत आहे. सबब सदर निधी वापरण्याची गरज पडत नाही. तो महोत्सव निधीमध्ये वर्ग करावा जेणेकरुन महोत्सव निधीत ₹ २६.८० लाखाची भर पडून तो ₹ ६३.८० लाख इतका होईल. वरील सूचनेला सर्व सभासदांनी टाळयांच्या गजरात मंजुरी दर्शविली.

२. नंतर सभासद श्री. गोविंद वागे यांनी अहवालातील Other Assets व Bad Assets write off वर काही प्रश्न उपस्थित केले. त्याची श्री. आंबेकर यांनी समर्पक उत्तरे दिली. तसेच निर्लेखित केलेल्या कर्जामध्ये सुध्दा ₹ १५६.०० लाख इतकी वसुली बँकेने केलेली आहे. यानंतर सभासद श्री. मनोहर पुरे यांनी Provision for Bad & Doubtful Debts ची ₹ ३.०० कोटी व Transfer from Gen-free Reserve ची ₹ २.३० कोटीची Provision का केली असा प्रश्न उपस्थित केला. त्यास उत्तर देताना मा. संचालक श्री. आंबेकर यांनी सांगितले की भविष्यातील आर्थिक परिस्थिती व व्यावसायिक परिस्थिती तसेच CRISIL ने केलेले NPA वाढीबाबत केलेले भाकीत याबाबी लक्षात घेऊन शक्य आहे तेवढी भविष्यातील तरतूद या वर्षी केली आहे.

३. a) श्री. अक्षय पटवर्धन यांनी ताळेबंद संदर्भात Movement of NPA मागील वर्षी NPA मध्ये ३.०० कोटीने वाढ झालेली आहे ती यावर्षी १९.२८ कोटींने वाढ झालेली आहे या मागची कारणे कळतील का अशी विचारणा केली.

b) रिझर्व्ह बँकेने ₹ १४.४७ लाखांचा जो दंड आकारला आहे. त्याबाबत खुलासा करावा असे सांगितले.

c) कर्ज मंजूर करताना ₹ १.०० कोटी वरील कर्जखात्यांचे External Agency कडून रेटींग करुन घ्यावे असे लेखापरीक्षक सातत्याने सुचवित आहेत त्याबाबत योग्य तो पाठपुरावा करावा. व

d)कॅश क्रेडिट लिमिट कर्जदारांना दिली जाते त्यावेळी बँक स्थावर मालमत्तेच्या तारणावर कॅश क्रेडिट कर्ज मंजूर करते, व D.P. Calculation योग्य प्रकारे होत नसल्याने त्याचा NPA वर परिणाम होतो का हे स्पष्ट करावे असे सांगितले.

यावर उत्तर देताना मा. संचालक श्री. सचिन आंबेकर यांनी सांगितले की NPA होण्यासाठी कोणतेही ठोस कारण नसते. कोणतेही खाते NPA होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत होतात. सध्याची आर्थिक, व्यावसायिक व सामाजिक परिस्थिती व इतर अनेक गोष्टींचा परिणाम कर्जखाते NPA होण्यावर होत असतो.

ताळेबंद पत्रकाच्या परिशिष्टामध्ये जो ₹ १४.४७ लाखांचा दंड आकारलेला दिसत आहे तो आपल्या बँकेचा नसून सातारा मर्चंट को-ऑप. बँक लि. चा आहे. सदर बँकेचे आपल्या बँकेत विलिनीकरण झाले, त्यावेळी त्यावेळी RBI च्या गाईडलाईन्स व मर्जर (Merger) Policy नुसार ताळेबंद पत्रकात ही रक्कम दाखविली आहे. आपल्या बँकेला RBI ने अद्यापपर्यंत दंड लावलेला नाही.

रुपये एक कोटी व त्यावरील कर्ज खात्याचे External Agency कडून Rating करुन घेण्याबाबत लेखापरिक्षकांनी कोणताही शेरा दिला नसून, त्यांनी फक्त मत व्यक्त केले आहे. External Agency कडून Rating करण्याबाबत RBI ची कुठलीही गाईड लाईन नाही. तरीही लेखापरिक्षकांनी दिलेल्या मताबद्दल बँक योग्य तो विचार करेल व निर्णय घेतला जाईल.

RBI च्या मार्गदर्शक तत्वानुसार Cash Credit खाते केवळ स्थावर मालमत्तेच्या तारणावर देता येत नाही. Cash Credit कर्ज Stock व Book Debt च्या तारणावर दिले जाते. आपली बँक दुय्यम तारण म्हणून स्थावर मालमत्ता घेते.

सभासद श्री. जुवेकर यांनी सांगितले की गेली तीन वर्ष महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडतोय. शेतकरी आत्महत्या करत आहेत. बँकेने आपल्या नफ्यातील काही भाग शेतकऱ्यासांठी वर्ग करावा असे सूचविले. याची सभेने नोंद घेतली व सभेपुढे पुढील ठराव मांडण्यात आले.

**विषय : संचालक मंडळाने सादर केलेले व वैधानिक लेखापरीक्षक मे. वैशंपायन ॲण्ड पाध्ये यांनी तपासलेले दि. ३१ मार्च, २०१५ अखेरचे ताळेबंद व नफा- तोटा पत्रकावर विचार करणे व तो स्वीकृत करणे.**

ठराव क्र. ४) संचालक मंडळाने सादर केलेले व वैधानिक लेखापरीक्षक मे. वैशपांयन ॲण्ड पाध्ये यांनी तपासलेले दि. ३१ मार्च २०१५ अखेरचे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक मा. संचालक श्री. सचिन आंबेकर यांनी वाचून दाखविले व समजावून सांगितले. त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. आशिष राम देवधर | सभासद क्र. ३५१०० |
| अनुमोदक : | श्री. आनंद नारायण कामत | सभासद क्र. २९४७१ |

ठराव बहुमताने मंजूर.

ठराव क्र. ४(अ) लाभांश समानीकरण निधी खाती ₹ २६,८०,०००/- रक्कम जमा आहे. आपल्या बँकेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष जवळ येत असल्याने व लाभांश समानीकरण निधीची आवश्यकता नसल्याने सदर निधी ₹ २६,८०,०००/- महोत्सव निधी खाती वर्ग करण्याबाबतचा ठराव मा. सभासद श्री. वामनराव साठे यांनी सभेपुढे मांडला.

लाभांश समानीकरण निधी खाती जमा असलेली रक्कम ₹ २६,८०,०००/- महोत्सव निधी खाती वर्ग करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. मधुकर खरे | सभासद क्र. ११८६ |
| अनुमोदक : | श्री. मकरंद ताम्हणे | सभासद क्र. २६१०० |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

**विषय: सन २०१४-१५ सालाच्या वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवालावर विचार करणे व तो स्वीकृत करणे.**

ठराव क्र. ५) सन २०१४-१५ सालाच्या वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल मा. संचालक श्री. सचिन आंबेकर यांनी सभेपुढे मांडला त्याची ही सभा नोंद घेऊन स्वीकृत करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. भालचंद्र मनोहर घाटे | सभासद क्र. ११६१४ |
| अनुमोदक : | श्री. सुभाष खंडू खैरनार | सभासद क्र. ६९७२ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

**विषय : सन २०१३-१४ सालच्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोषदुरुस्ती अहवालावर विचार करणे व तो स्वीकृत करणे.**

ठराव क्र. ६) सन २०१३-१४ सालच्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल मा. संचालक श्री. सचिन आंबेकर यांनी सभेपुढे मांडला. त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. शेखर सीताराम बर्वे | सभासद क्र. ९४८५ |
| अनुमोदक : | श्री. हेमंत हसमुखलाल शहा | सभासद क्र. ४७५१८ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

**विषय : संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१४-१५ सालच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.**

ठराव क्र. ७) सन २०१४-१५ या वर्षात निव्वळ नफा ₹ २२,०३,९५,२३९ इतका झाला आहे. संचालक मंडळाने नफा वाटणीस पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे. ती मा. संचालक श्री. मोहन आघारकर यांनी सभेसमोर मांडली. सदर नफा वाटणीस ही सभा मंजुरी देत आहे.

| | ₹ |
|---|---|
| निव्वळ नफा<br>+ लाभांश मधील जादा तरतूद<br>मागील शिल्लक | २२,०३,९५,२३९<br>९,६३,९८३<br>४९,३४० |
| **एकूण** | **२२,१४,०८,५६२** |
| राखीव निधी | ५,५५,००,००० |
| सर्वसाधारण मुक्त निधी | ३,००,००,००० |
| इमारत निधी | २,२६,००,००० |
| लाभांश १५% | ८,६०,००,००० |
| गुंतवणूक वध घट निधी | २,००,००,००० |
| सभासद कल्याण निधी | १५,००,००० |
| निवडणुक निधी | ७,००,००० |
| शैक्षणिक निधी | २८,५०,००० |
| धर्मादाय निधी | २२,००,००० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | ५८,५६२ |
| **एकूण** | **२२,१४,०८,५६२** |

सूचक : श्री. दिपक पांडुरंग ब्रीद सभासद क्र. ३९०३२
अनुमोदक : श्री. शशीकांत निवृत्ती आंधळे सभासद क्र. ४६४५८
ठराव बहुमताने मंजूर.

विषय पत्रिकेतील विषय सादर करण्यापूर्वी सभेस उपस्थित असलेले आपल्या बँकेचे सभासद डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे विद्यमान अध्यक्ष मा. श्री. उदय कर्वे यांचे मा. अध्यक्षांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डोंबिवलीतील प्रख्यात चार्टर्ड अकाउंटंट व CA असोसिएशनच्या वेस्टर्न रिजन कौन्सिल ठाणे शाखेचे उपाध्यक्ष श्री. सुहास आंबेकर यांचेही मा.अध्यक्षांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आपल्या बँकेच्या सभासद व डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर निवडून आलेल्या महिला संचालिका सौ. मेघना सचिन आंबेकर याही सभेस उपस्थित होत्या त्यांचेही मा. अध्यक्षांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**विषय :** **सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकाची नोंद घेणे.**

सन २०१५-२०१६ सालचे अंदाजपत्रकाबाबत मा. संचालक श्री. पद्मनाभ जोशी यांनी विवेचनात सांगितले की सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी बँकेने ठेवींचे ₹ २२८७ कोटी व कर्जांचे ₹ १५७३ कोटी असे उद्दिष्टे ठेवले असून पुढील वर्षी एकत्रित व्यवसाय ₹ ३८६० कोटी इतका करण्याचे ठरविले आहे.

ठराव क्र. ८) सन २०१५-१६ सालचे अंदाजपत्रक मा. संचालक श्री. पद्मनाभ जोशी यांनी सभेपुढे मांडले व समजावून सांगितले. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. मधुकर अनंत कुलकर्णी | सभासद क्र. २१२५२ |
| अनुमोदक : | श्री. जयवंत वासुदेव परब | सभासद क्र. ४७६२६ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

**विषय :** **बँकेचे वार्षिक ध्येयधोरणास मान्यता देणे.**

बँकेचे वार्षिक ध्येयधोरण सादर करताना मा. संचालक प्रा. विलास पेणकर यांनी सन २०१६-१७ सालाची व्यावसायिक उद्दिष्टे सांगितली.

ठराव क्र. ९) बँकेचे वार्षिक ध्येयधोरण मा. संचालक प्रा. श्री. विलास पेणकर यांनी सभेपुढे मांडले व समजावून सांगितले. त्यास ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. विनायक किसन इंगळे | सभासद क्र. ४६८३१ |
| अनुमोदक : | श्री. विनायक सिताराम देसाई | सभासद क्र. १५९०६ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

**विषय :** **बँकेच्या उपविधी दुरुस्तीस मंजुरी देणे.**

आपल्या बँकेचे कामकाज हे आपल्या संस्थेच्या उपविधीप्रमाणे चालते. हे कामकाज होत असताना काळानुरुप उपविधीमध्ये बदल करावे लागतात आणि ते व्यवसायाचे दृष्टीने आवश्यक असते.

यावेळी सभासद श्री. अक्षय पटवर्धन यांनी उपविधीतील सभासदांच्या सर्वसाधारण सभेतील उपस्थितीबाबतच्या दुरुस्तीवर आक्षेप घेतला व जे सभासद सभेस उपस्थित राहणार नाहीत त्यांच्याकडून अर्ज स्वीकारुन त्यांच्या रजेस मंजूरी दयावी असे सुचविले.

श्री. दिक्षीत यांनी यासाठी मोबाईलचा वापर करावा असे सुचविले.

श्री. शिंपी यांनी सभासदांच्या सर्वसाधारण सभेतील अनुपस्थितीबाबत जो मुद्दा मांडला, त्यास व श्री. पटवर्धन व दिक्षीत यांच्या प्रश्नांना मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक व मा. अध्यक्षांनी समर्पक उत्तरे दिली.

ठराव क्र. १०) बँकेच्या उपविधी क्र. ५(xxxviii), ६(a)(xii), १०(ii)(c), २२(b), ३२ (r), ४२(१)(a), ४६, ५५, ५८(f) आणि ६० मध्ये संचालक मंडळाने शिफारस केलेल्या व सन २०१४-१५ च्या वार्षिक अहवालात दर्शविलेल्या उपविधी दुरुस्ती बाबतचा ठराव मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक यांनी सभेपुढे मांडला. त्यास ही सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. रितेश प्रदीप फडके | सभासद क्र. ४९९२५ |
| अनुमोदक : | श्री. राजेंद्र सूर्यकांत जोशी | सभासद क्र. ४२९८४ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

मा.अध्यक्षांनी विषय पत्रिकेवरील पुढील विषय मांडण्याबाबत संचालिका सौ.माधुरी वझे यांना सांगितले.

**विषय : आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अंतर्गत हिशेब तपासणी, कर परीक्षक, गुंतवणूक लेखापरीक्षक व समवर्ती लेखापरीक्षक यांची नेमणूक करणे.**

बँकेच्या विविध शाखा तसेच गुंतवणूक, KYC लेखापरीक्षण, समवर्ती लेखापरीक्षण, अंतर्गत लेखापरीक्षण इ. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार आपण विविध CA फर्मकडून करुन घेत असतो. कामकाजात सुसुत्रता आणणे आणि सुधारणा करणे यासाठी त्याचा चांगला उपयोग होत असतो. लेखापरीक्षकांच्या नेमणुकीबाबतचा ठराव पुढीलप्रमाणे मांडण्यात आला.

ठराव क्र. ११) आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अंतर्गत हिशेब तपासणी, कर परीक्षण, गुंतवणूक लेखापरीक्षण, समवर्ती लेखापरीक्षण करणेकरीता व तपासनीसांची नेमणूक करण्याचा तसेच त्यांचा मेहेनताना ठरविण्याचा अधिकार ही सर्वसाधारण सभा संचालक मंडळास देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. लक्ष्मण हरी वागे | सभासद क्र. ३४६४० |
| अनुमोदक : | श्री. गोविंद शिवराम वागे | सभासद क्र. १९०१० |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

**विषय : सन २०१५-१६ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.**

मा. अध्यक्षांनी सांगितले की सन २०१३ पासून सहकार खात्याने वैधानिक लेखापरीक्षकांच्या निवडीची प्रक्रिया ठरविली आहे. त्यानुसार संचालक मंडळाने सदर नेमणूकीबाबत शिफारस केलेली आहे.

ठराव क्र.१२) सन २०१५-१६ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालिका सौ. पुष्पा कदम** यांनी सभेपुढे मांडला.

सन २०१५-१६ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या मे. किर्तने अँड पंडीत एल एल पी सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्यास ही सभा मंजुरी देत आहे व नियमानुसार त्यांचा मेहेनताना देण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. संजय पुरुषोत्तम रत्नपारखी | सभासद क्र. १४७६४ |
| अनुमोदक : | श्री. राजेंद्र पोपट घोडके | सभासद क्र. ११५८८ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

**विषय : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार आहेत व त्याची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही.

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबतचा ठराव **मा. संचालक श्री. दिलीप दळवी** यांनी मांडला.

ठराव क्र. १३) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आहेत व त्याची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | सौ. राजश्री रवींद्र मोहरे | सभासद क्र. ११९१३ |
| अनुमोदक : | सौ. स्मृती प्रकाश पवार | सभासद क्र. १२४२९ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक डॉ. संदिप जाधव यांना सांगितले.

**विषय : सन २०१५-२०१६ मध्ये सभासदांना द्यावयाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची व मागील वर्षीच्या प्रशिक्षणाची नोंद घेणे.**

रिझर्व्ह बँक व सहकारी कायदा यामुळे बँकेच्या कामकाजात वारंवार बदल होत असतात. बँकेच्या कामकाजाची माहिती सभासदांना देण्यासाठी बँक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करत असते. याबद्दलची माहिती मा. संचालक डॉ. संदिप जाधव यांनी सभेस दिली व पुढील ठराव सभेपुढे मांडला.

ठराव क्र. १४) बँकेच्या सभासदांना सन २०१५-१६ मध्ये द्यावयाच्या आणि सन २०१४-२०१५ मध्ये दिलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती **मा. संचालक डॉ. संदिप जाधव** यांनी सभेत सांगितली, याची सभेत नोंद घेण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. निलेश मनोहर सारंग | सभासद क्र. ४८१९३ |
| अनुमोदक : | श्री. रामचंद्र मारुती मुकदुम | सभासद क्र. ४१८२३ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

श्री. विश्वास जोशी यांनी वरील ठरावाला अनुसरुन प्रश्न विचारला, की बँकेने Budget निमित्त जो कार्यक्रम आयोजित केला होता, त्यास सभासदांची उपस्थिती का कमी होती? तसेच सर्व सभासदांना सदर कार्यक्रमाची माहिती देण्यात आली होती का?

मा. संचालक डॉ. संदिप जाधव, यांनी सदर प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले की, सदर कार्यक्रमाचे बॅनर सर्व शाखांमध्ये लावण्यात आले होते. तसेच वृत्तपत्रात सदर कार्यक्रमाची माहिती प्रसिध्द करण्यात आली होती. व त्याची नोंद घेऊन बरेचसे सभासद कार्यक्रमास उपस्थित होते.

पुढील ठराव मांडण्यासाठी अध्यक्षांनी मा. संचालक प्रा. (डॉ) वसंत काणे यांना सांगितले.

**विषय : वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली ज्या खात्यात वसुलीची शक्यता नाही अशी कर्ज खाती, वसुलीचे सर्व हक्क अबाधित राखून निर्लेखित करणे व नफा - तोटा खाती न घेतलेले व्याज उलटविणे.**

वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली व ज्या खात्यांमध्ये वसूलीची शक्यता नाही अशा खात्यांची माहिती मा. संचालक, प्रा.(डॉ.) वसंत काणे यांनी सभेस दिली. या अनुषंगाने सभासद श्री. अक्षय पटवर्धन यांनी विचारले की ही खाती NPA झाली, त्यांचे प्रोसेसिंगमध्ये काही चुका झाल्या का व त्यांची मालमत्ता असेल तर ती जप्त केली का?

त्यास उत्तर देताना प्रा. काणे सरांनी सांगितले की कर्जखात्यात वसूली होणे आवश्यक असले तरी काही वेळा परिस्थिती अशी असते की कर्जखात्यात वसूली होऊ शकत नाही यास अनेक बाबी कारणीभूत असतात.

श्री. अक्षय पटवर्धन यांनी कर्जखात्यांचे रेटिंग External Agent कडून करणे आवश्यक आहे व ते करुन घेतल्यास NPA कमी होऊ शकतात. तेव्हा मा. (डॉ.) काणे सरांनी सांगितले मोठे कर्जखात्यांमध्ये रेटिंग करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण प्रयत्नशील असतो. जेवढी काळजी घेणे आवश्यक आहे तेवढी काळजी कर्ज देताना आपल्या बँकेत घेतली जाते.

श्री. अरुण शिंपी यांनी सदर थकीत कर्जखात्यांची नावे जाहीर करावीत असे सांगितले. त्यावेळी मा. अध्यक्षांनी उत्तर दिले की कायद्यातील तरतूदीनुसार व सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार नावे जाहीर केली जाणार नाहीत.

श्री. अरुण शिंपी यांनी थकीत कर्जदारांची संख्या ३२२४ इतकी असून त्या कर्जदारांवर केलेल्या कारवाईची माहिती मागितली. त्यावर उत्तर देताना मा. संचालक प्रा. (डॉ.) वसंत काणे यांनी सांगितले की सर्व कर्जदारांवर योग्य ती कारवाई केली आहे. Recovery Cell वसुलीसाठी सतत प्रयत्नशील असतो.

बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली ज्या खात्यात वसुलीची शक्यता नाही अशी खाती, वसुलीचे सर्व हक्क अबाधित राखून निर्लेखित करणे व नफा - तोटा खाती न घेतलेले व्याज उलटविण्यासंबंधात मा. संचालक प्रा. (डॉ.) वसंत काणे यांनी प्रस्ताव मांडला.

ठराव क्र. १५) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या अनुत्पादित कर्जखात्यांमधील मुद्दल ₹ १,५९,१२,५५२.२९ निर्लेखित करण्यास ही सभा मंजुरी देत आहे व नफा - तोटा खाती न घेतलेले दि. ३१.०३.२०१५ पर्यंतचे व्याज ₹ ८,९०,०६,७१६.३१ अधिक पुढील व्याज उलटवण्याच्या संचालक मंडळाच्या निर्णयास सदर सभा कायम करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. नंदकुमार गजानन दुर्वे | सभासद क्र. ३४४३२ |
| अनुमोदक : | श्री. सचिन अर्जुन कदम | सभासद क्र. २५४९१ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

मा. अध्यक्षांनी पुढील विषय सभेपुढे मांडण्यासाठी मा. संचालक श्री. रमेश गोरे यांना सुचित केले.

**विषय : या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

ठराव क्र. १६)या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा ठराव मा. संचालक श्री. रमेश गोरे यांनी सभेपुढे मांडला. अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती ही सभा क्षमापित करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. सत्यवान रामभाऊ आगम | सभासद क्र. ४६८९ |
| अनुमोदक : | श्री. विश्वास वसंत धामणकर | सभासद क्र. २३५७ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

विषय पत्रिकेवरील सर्व विषय संपलेले आहेत, आयत्यावेळचे कुठलेही विषय नसतील तर मा. अध्यक्षांनी आभार प्रदर्शन करण्याबाबत बँकेचे उपाध्यक्ष मा. मधुसुदन पाटील यांना सुचित केले.

कोळसेवाडी शाखेतील खातेदार गाडी लोहार समाज उन्नती मंडळाचे पदाधिकारी व बँकेचे सभासद यांनी पुढील विचार मांडले.

सर्वप्रथम मी बँकेचे अभिनंदन करु इच्छितो कारण सरकारी बँकांच्या स्पर्धेत आपली बँक आता उतरली आहे. नेट बँकींग सुविधा सर्व ग्राहकांना व सभासदांना दिलेली आहे. परंतु, त्यांनी सूचना केली की सुट्टीच्या दिवशी आपली ATM बंद असतात. एखादया संस्थेचे, ट्रस्टचे बचत खाते शाखेत असते व KYC ची सर्व कागदपत्रे बँकेकडे सादर केलेली असतात अशावेळी मुदत ठेव ठेवतांना पुन्हा सर्व कागदपत्रे मुदत ठेव विभागाकडून मागितली जातात. सदर बाबींचे समर्पक स्पष्टीकरण बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर व मा. अध्यक्षांनी दिले व याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

हेमंत मोने या सभासदाने  मराठी भाषेला वैधानिक दर्जा मिळावा, लेखापरीक्षण अहवाल मराठीतून मिळावा अशी विनंती केली व कॅलेंडरबाबत काही सूचना केल्या सभेने सदर बाबीची नोंद घेतली.

यानंतर श्री. विश्वास जोशी यांनी टिळक चौक येथील मुख्य शाखा पहिल्या मजल्यावर का, मुख्य कार्यालय निहारिका येथे की आधारवाडी येथे ते स्पष्ट करावे, बँक अजूनही निहारिका येथील जागेचे भाडे भरत आहे. तसेच २०१३ साली वार्षिक सर्वसाधारण सभेत श्री. कुलकर्णी यांना गायन समाजामध्ये LIFT बसवू असे सांगितले होते. परंतु अजूनपर्यंत का नाही बसवली असे प्रश्न उपस्थित केले. त्यास उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की तुमच्या प्रश्नांना लेखी स्वरुपात उत्तरे दिली आहेत. श्री. दिक्षीत यांनी वाडेघर चौक येथील सुशोभिकरणाचे काम कोणास दिले आहे असे विचारले. तेव्हा मा. अध्यक्षांनी सांगितले की, श्री. दिक्षित यांना सर्व प्रश्नांची लेखी स्वरुपात उत्तरे दिली आहेत. याप्रसंगी काही सभासदांनी नाराजी व्यक्त करुन सभेत गोंधळ निर्माण केला.

मा. उपाध्यक्ष श्री. मधुसूदन पाटील यांनी सर्व सभासदांचे आभार मानले. काही सभासदांनी उपयुक्त सूचना दिल्या याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सभेसाठी हॉल उपलब्ध करुन देणारे महावीर हॉल चे व्यवस्थापक व सभेचे चित्रीकरण करणारे श्री. श्रीनिवास लेले यांचे आभार मानले. बँकेचे एक्झिक्युटिव्ह, अधिकारी, कर्मचारी यांना देखिल धन्यवाद दिले.

यानंतर मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

# सभासद कल्याण निधी

## १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ चा जमा खर्च

| **जमा** | | **(₹)** | **खर्च** | | **(₹)** |
|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | | सभासदांच्या मृत्युनंतर वारसांना दिलेली मदत | १०२०००.०० | |
| | | | सभासदांना दिलेली वैद्यकीय मदत | ९३८०००.०० | |
| | | | सभासदांच्या वैद्यकीय तपासणीचे बील | ४०००.०० | |
| | | | विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार | १७४९६७.०० | |
| मुदत ठेव | १००००००.०० | | ऑडीट फी | १०२६०.०० | १२२९२२७.०० |
| बचत खाते | ३९३३५४.४९ | १३९३३५४.४९ | | | |
| | | | अखेरची शिल्लक | | |
| | | | बचत खाते | १७८६८४६.४९ | १७८६८४६.४९ |
| सन २०१५-२०१६ साठी बँकेकडून प्राप्त निधी | | १५०००००.०० | | | |
| व्याज जमा | | | | | |
| बचत खाते | ४११५५.०० | | | | |
| मुदत ठेव | ८१५६४.०० | १२२७१९.०० | | | |
| **एकूण** | | **३०१६०७३.४९** | | | **३०१६०७३.४९** |